

## कसदार वाङ्मयासाठी
# रसिक.कॉम

■ लता भावे

विविध व्यक्तींच्या विविध आवडीनिवडी व छंद असतात. त्यापैकी एक म्हणजे वाचनाची आवड. रिकाम्या वेळात मनोरंजन, थकल्याभागल्या मनाला विरंगुळा, ज्ञानवृद्धी इ. साधले जाते. काहींना दर्जेदार साहित्य आवडते, काहींना हलके-फुलके पण चांगले साहित्य हवे असते, काहींना ठरावीक प्रकारचे, तर काहींना विशिष्ट विषयावरील साहित्य हवे असते आणि ते जर उपलब्ध असेल तर काही प्रश्नच नाही असे वाटते. पण अमेरिकेत फार पूर्वीपासून राहणाऱ्यांना आणि नव्याने येणाऱ्यांना हा एक मोठा प्रश्नच असतो की हे साहित्य इथे कसे मिळवायचे? अमेरिकेत या दृष्टीने सोय आहे का? अशी सोय करता येईल का? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आपल्याला 'रसिक.कॉम' ही वेबसाईट बघायला हवी. कारण वाचन भुकेला खाद्य लगेच मिळवायला हवे ना?

'रसिक.कॉम'च्या श्री. रवी आपटे आणि श्री. अजित भावे या दोन संचालकांशी याबाबतीत बोलण्याचा योग माझ्या प्रस्तुतच्या अमेरिका भेटीत आला.

**भावना व उद्देश :**

"अमेरिकेशी मराठी भाषिकांचे आवागमन गेल्या काही वर्षांत वाढले आहे. कमीजास्त कालावधीसाठी येणाऱ्यांना दैनंदिन गरजेचे सर्व साहित्य वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच वाचन-साहित्यपण आहे," असे श्री. रवी आपटे म्हणाले. त्यांनी सांगितले, "रसिक या शब्दाची निवड करतानाच आम्ही दर्जेदार साहित्य व ते वाचकांपर्यंत दर्जेदार सेवेने पोचवण्याची व्यवस्था हा मूळ उद्देश ठेवला." मराठी भाषिकांना संस्कृती जतन करण्यासाठी वाचन-साहित्य सहज उपलब्ध करून देण्याची कल्पना श्री. आपटे यांच्या मनात बरेच दिवस रुजत होती. मराठी भाषिकांचा वाढता वाचकवर्ग, दूरसंचार सेवेतली विविधता व संगणकाद्वारे सुलभ झालेल्या अनेक सोयी यांचा उपयोग करून त्यांनी मनातल्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

**पूर्वतयारी :**

भारतातून लोकप्रिय, श्रेष्ठ पुस्तके संग्रही ठेवण्यासाठी श्री. आपटेंनी पुस्तक खरेदी सुरू केली. ३००० पुस्तकांचा संग्रह आपल्या घरी तयार केला व प्रारंभी पुस्तक विक्री करण्याच्या दृष्टीने काम सुरू झाले. भारतभेटीतील अल्पकाळात पुस्तके विकत घेऊन इथे आणणे किंवा आप्तेष्टांकडून आवडीची पुस्तक मागवणे सर्वांना शक्य नसते. म्हणून रसिकमार्फत १९९८ मध्ये पुस्तकविक्री सेवा सुरू झाली.

**सेवेचा श्रीगणेशा व पुढील वाटचाल :**

वाचकांकडून या सेवेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. वाचकांकडून अनेक सूचना घेऊन रसिक.कॉम वेबसाईटवर दिसणारी माहिती आकर्षक करण्यात आली. वेबसाईटशी झटापट न करता पुस्तक विकत घेण्याची क्रिया पण अगदी सुलभ करण्यात आली. पुस्तके, लेखक, प्रकाशक यांच्या लांबलचक याद्या देण्याऐवजी सोपा 'मराठी शब्दांतर्फे शोध' हा मार्ग वेबसाईटवर निर्माण केला गेला. ३००० पुस्तकांचा रसिकांकडून फडशा पाडण्याआधीच, वाचकांनी विकत घेतलेली पुस्तके भारतातून सरळ खरेदी करणाऱ्याला घरपोच करण्याची सोय पण पुण्यातल्या गॅलक्सी इंटरनॅशनलच्या सौ. सुनिता देसाई यांच्या सहकार्याने सुरू केली गेली.

पुस्तकविक्रीला प्रतिसाद मिळू लागल्यावर श्री. आपटे व श्री. भावे यांना आणखी एक कल्पना सुचली. ती म्हणजे पुस्तकविक्री सेवेला पुस्तक-वाचनालय सेवेची जोड देण्याची. दोघांनी सुसंबद्ध व सुटसुटीत वाचनालय सेवा देऊन रसिकचा दर्जेदारपणा टिकेल अशी प्रक्रिया निश्चित केली. त्यांनी जणू ब्रीदवाक्यच तयार केले की, आमच्या सेवेतर्फे तुमच्या आवडीचे पुस्तक तुम्हाला अगदी जगात कुठेही असलात तरी घरपोच, तुम्ही पुस्तकासाठी मागणी करा फक्त. अमेरिकेतल्या कोणत्याही भागात तुम्ही असलात तरी आम्ही आहोत वाचनालयाच्या घरपोच सेवेसाठी सिद्ध. या संचालकद्वयांना आता २००५ मध्ये सांगावेसे वाटते की, २००२ पासून आम्ही सुरू केलेली पुस्तक-वाचनालय सेवा आता छान प्रतिसाद मिळवत आहे. श्री. भावे म्हणाले, "पुस्तकविक्री सेवेसह समृद्ध करण्यासाठी साहाय्यक आहोत. तर पुस्तक वाचनालय

सेवेद्वारे आम्ही त्यांचे मनोरंजन व ज्ञानसमृद्धीही करीत आहोत.''

वाचनालयाची पुस्तके व्यवस्थित घरी पाठवण्याची काय व्यवस्था? या विषयी श्री. भावे यांनी सांगितले की, 'प्रारंभी पॉलिथिन पिशव्यांचा उपयोग करत होतो. पण पोस्टाच्या प्रवासात पिशव्या फाटणे, पुस्तके गहाळ होणे असे प्रकार फार होऊ लागले. पण आता तसे होत नाही.' याला कारण त्यांनी सांगितले की, आता पुस्तके कार्डबोर्डच्या बॉक्समध्ये घालून, आजूबाजूला नीट पॅकेजिंगच्या गोळ्या ठेवून वरचा भाग व्हेल्क्रोच्या पट्टीने बंद केला जातो. आम्हाला पुस्तकांच्या नीट पोचण्याची समस्या उरलेली नाही.

**काही वैशिष्ट्ये :**

मराठी पुस्तकांच्या विक्री व पुस्तक वाचनालय इंटरनेटद्वारा करणारी रसिक.कॉम ही एकमेव सेवा आहे, हे रास्त अभिमानाने सांगून श्री. रवी आपटे म्हणाले, ''आमच्या सेवेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हे पुस्तकालय इंटरनेटच्या जाळ्यावर आधारित असल्यामुळे कुणाला पुस्तके धुंडण्यासाठी कुठे जावे लागत नाही. पुस्तकांची मागणी अगदी घरबसल्या करता येते. आमच्या वेबसाईटवर पुस्तकांच्या सूचीचा शोध घेण्याची सुविधा आहे, मुखपृष्ठाची चित्रे आहेत, बऱ्याच पुस्तकांची परीक्षणे पण आहेत. तुम्ही फक्त पुस्तकांची निवड करून आम्हाला कळवायची.''

''आमची वेबसाईट www.rasik.com/marathi ही पुस्तके विकत घेण्यासाठी आणि www.rasik.com/library वाचनालयासाठी आहे. त्यावर आपले नाव, पत्ता, ई-मेल पत्ता अशी माहिती भरल्यावर आमच्याकडून तुम्हाला सभासदत्व म्हणून युजर आय.डी. मिळतो. त्या सभासदत्वाद्वारे पुढे तुम्ही पुस्तकांची देवाण-घेवाण करता. आपल्या मागणीनुसार पुस्तके लगेच पोस्टाने पाठवली जातात. वाचनालयातले पुस्तक बाहेर गेले असल्यास ते पुस्तक तुम्ही आमच्या प्रतिक्षासूचीत दाखल करू शकता. ते पुस्तक मग दुसऱ्या वाचकाकडून परत आले की तुम्हाला मिळू शकते.''

श्री. भावे म्हणाले, ''आमच्याजवळ सुमारे एक हजाराहून अधिक पुस्तके आहेत. काही लोकप्रिय पुस्तकांच्या एकाहून अधिक प्रती आहेत. त्यामुळे लोकप्रिय पुस्तके बऱ्याच वाचकांना एकाच वेळी वाचता येतात. हे एक वैशिष्ट्यच आहे आमच्या सेवेचे. आमच्या वाचनालय संग्रहात धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, तत्त्वज्ञानावरील, संशोधनपर ग्रंथाबरोबरच आत्मचरित्रे, चरित्रे, ललित लेख, कविता संग्रह इ. सर्व प्रकारची पुस्तके आहेत.''

तर श्री. रवी आपटे यांनी खुलासा केला की, ''२००१ सालापासून या संग्रहाला जोड म्हणून दिवाळी अंकांचीपण भरती करण्यात आली आहे. दिवाळीच्या फराळाबरोबरच दिवाळी अंकाचा रुचकर आस्वाद आमच्या वाचकांना देण्याचा एक आगळाच आनंद आम्ही घेत आहोत.''

**अमेरिकेशी मराठी भाषिकांचे आवागमन गेल्या काही वर्षांत वाढले आहे. कमीजास्त कालावधीसाठी येणाऱ्यांना दैनंदिन गरजेचे सर्व साहित्य वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच वाचन-साहित्यपण आहे.**

**वाचनालय सभासदत्वाचे नियम :**

'पुस्तक वाचनालयाच्या सेवेसाठी सभासदत्व कसे घ्यायचे?' हा एक प्रश्न तुम्हाला असणारच. तो पण आम्ही सुलभच ठेवला आहे, असे श्री. आपटे म्हणाले. ''त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक किंवा फक्त दिवाळी अंकांसाठी तुम्ही सभासदत्व घेऊ शकता. यातही आम्ही वाचकांच्या सोयीचाच विचार प्रामुख्याने ठेवला. कारण कोणाकडे तीनचार महिने आईवडिल येतात, आप्तमंडळी, मित्रमंडळी येतात. त्यांना करमणूक म्हणून पुस्तके, मासिके वाचायला हवी असतात. वर्गणी क्रेडिट कार्डाद्वारे द्यावी लागते. एखादे आवडते पुस्तक वा मासिक आमच्या संग्रहात नसले तर आमच्याकडे तशी मागणी केल्यास आम्ही आनंदाने त्याची विक्री-पुस्तकांच्या सूचीत वा वाचनालयात नोंद करू शकतो. आणखी एका मुद्द्याचा खुलासा म्हणजे एकावेळी सहापर्यंत पुस्तकांची वाचनालयातून मागणी करता येते. ती पुस्तके किती कालावधीत परत करायची व त्यासाठी लागणारे पोस्टेज इ. सर्व गोष्टी पुस्तकांच्या बॉक्समध्ये तुम्हाला मिळतात.''

''आमच्या या सेवेत काही वैयक्तिक कारणामुळे गैरसोयी भासत असल्यास किंवा सेवा सोयीत काही सुधारणा हवी असल्यास तसे आम्हाला कोणी कळवताच आम्ही त्यावर उदार दृष्टिकोनातून लगेच विचार करतो.''

**वाचकांसाठी संदेश :**

आपटे-भावे यांच्या संग्रहात भारतीय लेखकांची मराठी भाषेतली पुस्तके आहेतच. तसेच अमेरिकेत वास्तव्य करून असणारे व मराठी भाषेत लिखाण करणारे साहित्यिक आणि त्यांचे साहित्य यांनाही प्रसिद्धी देण्यात रसिक.कॉम सतत प्रयत्नशील आहे. कोणास संशोधनाच्या दृष्टीने, सखोल अभ्यास करण्यासाठी काही विशेष साहित्य हवे असल्यास तेसुद्धा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो.

एकंदरीत रसिक या शब्दाचा गर्भित अर्थ दर्जेदार, श्रेष्ठ, उच्चस्तरित कृतीचा चाहता हा आहे. त्या अपेक्षेप्रमाणेच ग्रंथसंग्रहालय-वाचनालय सेवा रसिक अविरत प्रयत्नशील राहणार आहेत.

■ लता भावे